| | | | |
|---|---|---|---|
| **MHAH160011032022** | दाखल दिनांक | :- | ०५.०९.२०२२ |
| | नोंदणी दिनांक | :- | ०५.०९.२०२२ |
| | निकाल दिनांक | :- | १०.०४.२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०३ ०७ ०५ |

**<u>अकोले येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,</u>**
**<u>ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात</u>**
( पिठासीन अधिकारी अनंत रा. टेंगसे )
न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १० एप्रिल, २०२६
( संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३९६/२०२२ ) **निशाणी १५ सोबत**

गुन्हा नोंद क्रं. ३०२/२०२२, अकोले पोलीस स्टेशन, ता. अकोले.

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>अकोले पोलीस स्टेशन, अकोले,<br>ता. अकोले, जि. अहमदनगर. |
| अभियोग पक्षातर्फे | | विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती. एस. ए. भोसले. |
| आरोपी | | **सागर विजय देशमुख,**<br>वय वर्ष – २८,<br>रा. इंदोरी,ता. अकोले, जि. अहमदनगर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. एस. एस. साबळे. |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २२.०६.२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २८.०६.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०३.०९.२०२२ |
| प्रतिकथन नोंदवल्याची दिनांक | :- | २४.११.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | ०२.०२.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | नाही. |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १०.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सागर विजय देशमुख | नाही | १९.०८.२०२५ | भा.द.वि.क. २७९, ३३७, ३३८, मो.वा.का.क. १८४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | स्वाती प्रदिप देशमुख | फिर्यादी | १५ सोबत |
| २. | प्रदिप दत्तात्रय देशमुख | साक्षीदार | १५ सोबत |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १७ | फिर्यादीवरील सही |

| | | |
|---|---|---|
| २. | १८ | प्रथम खबरी अहवालावरील सही |
| ३. | १९ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | २० व २१ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

## न्या य नि र्ण य

( दिनांक १०.०४.२०२६ रोजी घोषित केले )

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द त्यांनी भारतीय दंड संहिता (यापुढे थोडक्यात भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) कलम २७९, ३३७, ३३८, मोटार वाहन कायदा कलम १८४ नुसार गुन्हा केलेचे आरोपांबाबत चालविण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे –**

**२.** दिनांक २२.०६.२०२२ रोजी सायंकाळी ०६:३० वाजताचे सुमारास फिर्यादीचे पती हे नेहमीप्रमाणे फिरण्यासाठी अकोले ते राजुर रोडला गेले होते व फिर्यादीला घरगुती काम असल्याने ती घरीच होती. सायंकाळी ०७:१५ वाजताचे सुमारास फिर्यादी घरी असताना त्यांच्या ओळखीचे रामदास मंडलिक हे त्यांच्याकडे घरी आले व त्यांनी सांगितले की, तुमचा पती प्रदिप देशमुख हे पायी चालत जात असताना नवलेवाडी फाटा येथे गेले व सायंकाळी ०७:०० वाजताचे सुमारास त्यांना पाठीमागुन येणारी गाडी क्र. एम.एच ०४ एच.एक्स ९६०८ वरील चालक सागर विजय देशमुख रा. इंदोरी फाटा ता. अकोले धडक दिल्याने अपघात होऊन अपघात तुमचे पती प्रदिप देशमुख यांना डोक्याला, तोंडाला पाठीला, बरगडीला, हाताला, पायाला मार लागला आहे व त्यांना औषधोपचारकामी ग्रामीण रुग्णालय अकोले येथे घेऊन गेले आहेत असे सांगितल्याने ती लागलीच रामनाथ मंडलिक यांचेसमवेत ग्रामीण रुग्णालय अकोले येथे गेली. त्यावेळी तिचा पती यांच्यावर औषधोपचार

चालु होते त्यानंतर ती तिच्या पतीला घेऊन घरी गेली. घरी गेल्यानंतर त्यांची तब्येत परत खालावल्याने तिने परत तिच्या पतीला आरोटे हॉस्पीटल संगमनेर येथे नेवुन ॲडमीट केले. त्यानंतर त्यांच्यावर तेथे औषधोपचार चालु असल्यामुळे ती त्यांच्यापाशीच थांबून होती. तिच्या पतीला बरे वाटल्यानंतर तिने अकोले पोलीस स्टेशन येथे जावून आरोपीविरध्द सविस्तर फिर्याद दिली.

**३.** फिर्यादीच्या फिर्यादीवरुन अकोले पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ३०२/२०२२ भा.द.वि.चे कलम २७९, ३३७, ३३८, मो.वा.का. कलम १८४ अंतर्गत नोंदविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी तपासदरम्यान साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले आणि इतर आवश्यक तो तपास केला. तसेच त्यांच्या तपासात प्रस्तुत आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळुन आलेने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपी हजर झाल्यानंतर त्याचेविरुध्द निशाणी १५ खाली भा.द.वि.चे कलम २७९, ३३७, ३३८, मो.वा.का. कलम १८४ नुसार गुन्ह्याचा तपशिल नोंदवला. आरोपीने गुन्हा नाकबुल करून संपरिक्षेची मागणी केली.

**५.** अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता फिर्यादी व इतर एक साक्षीदाराची साक्ष नोंदवली. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी अभियोगपक्षास समर्थन दिले नाही त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरवा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द पुरावा मिळून न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता (यापुढे थोडक्यात ''संहिता'' असे संबोधण्यात येईल) कलम ३१३(१)(ब) चे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे

विद्वान विधीज्ञ श्री. एस. एस. साबळे यांचा युक्तीवाद ऐकला. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावे बघता माझे निष्कषार्थ खालील मुद्दे निघतात. त्याचे उत्तरे मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे दिली आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने दिनांक २२.०६.२०२२ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता अकोले–राजुर रोड, अकोले येथे त्याचे ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच ०४ एच.एक्स. ९६०८ ही निष्काळजीपणे व बेदरकारपणे मनुष्याचे जिवीतास हानी पोहोचेल अशा पध्दतीने चालवून अपघात केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| २. | आरोपीने उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी त्यांचे ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच ०४ एच.एक्स. ९६०८ ही अविचाराने, भरधाव वेगाने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन फिर्यादीचा पती प्रदिप देशमुख यांना धडक देवून किरकोळ दुखापतीस कारणीभुत ठरलात, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| ३. | आरोपीने उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी त्यांचे ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच ०४ एच.एक्स. ९६०८ ही अविचाराने, भरधाव वेगाने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन फिर्यादीचा पती प्रदिप देशमुख यांना धडक देवून गंभीर दुखापतीस कारणीभुत ठरलात, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| ४. | आरोपीने उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी त्यांचे | |

| | | |
|---|---|---|
| | ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच ०४ एच.एक्स. ९६०८ ही सार्वजनिक ठिकाणी लोकांना धोकायदायक ठरेल अशा पध्दतीने चालवली, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| **५.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशा– प्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता**

**७.** आरोपीवर लादलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने अभिलेखावर फिर्यादी स्वाती प्रदिप देशमुख (स.सा.क्र.१) व प्रदिप दत्तात्रय देशमुख (स.सा.क्र.२) यांची साक्ष नोंदवली.

८. फिर्यादी स्वाती प्रदिप देशमुख (स.सा.क्र.१) हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, घटना दिनांक २२.०६.२०२२ रोजी संध्याकाळी ०७:०० वाजता नवलेवाडी फाटा येथे घडली होती. त्यावेळी तिचा पती प्रदिप दत्तात्रय देशमुख हे राजुर रोडला फिरण्यासाठी गेले होते त्यावेळी त्यांना एका अज्ञात वाहनाने धडक दिली. सदर वाहनाचा नोंदणी क्रमांक व चालकाचे नाव काय होते हे त्यांना माहीती नाही. सदर अपघातामध्ये त्यांच्या पतीच्या डोक्याला, हातापायाला लागले होते. त्यांच्या पतीस अगोदर अकोले येथील ग्रामीण रूग्णालयामध्ये नेले होते व तेथून त्यांना संगमनेर येथील आरोटे हॉस्पीटल येथे नेले होते. तेथून आल्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. सदर साक्षीदाराने तिच्या फिर्यादीवरील व छापील प्रथम खबर अहवालावरील सही ( अनुक्रमे निशाणी १७ व १८ ) वगळता उर्वरीत सर्व मजकुर नाकारला.

**९.** प्रदिप दत्तात्रय देशमुख (स.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, घटना सन २०२० मध्ये संध्याकाळी ०७:०० वाजता घडली होती. त्यावेळी ते कोल्हार–घोटी रोडला फिरण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना धक्का लागल्याने खाली पडले व बेशुध्द झाले. त्यानंतर काय झाले हे त्यांना माहीती नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवला नव्हता.

**१०.** सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांची सखोल उलटतपासणी घेतली परंतु, अभियोगपक्षास पुरक बाबी अभिलेखावर आल्या नाहीत.

**११.** अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे विवेचन केले असता दिनांक २२.०६.२०२२ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता अकोले–राजुर रोड, अकोले येथे आरोपी सागर विजय देशमुख याने त्याचे ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच ०४ एच.एक्स. ९६०८ ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे, बेदरकारपणे चालवली व फिर्यादीचे पती प्रदिप देशमुख यांना धडक देवून किरकोळ व गंभीर दुखापत केली याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. आरोपीने अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा (निशाणी १९) व वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी २० व २१) कबुल केले असले तरी त्या कबुलीस निर्णायक पुरावा म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपीविरुध्दचे दोषारोपातील आरोप सिध्द झाले आहेत असे म्हणता येणार नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ ते ४ चे उत्तर नाही असे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता</u>**

**१२.** मुद्दा क्रमांक १ ते ४ वरील निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सदर न्यायनिर्णयाविरुध्द अपिल किंवा इतर कारवाईमध्ये हजर राहण्याकरीता आरोपीने जामिन दिलेला आहे. सबब,

मुद्दा क्र. ५ च्या उत्तराकरीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

| **आदेश** | |
|---|---|
| **१.** | आरोपीस भा.द.वि.चे कलम २७९, ३३७, ३३८, मो.वा.का. कलम १८४ या कलमांअंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांतुन संहितेचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| **२.** | आरोपीने यापुर्वी दिलेले जामिन कदबे व बंधपत्रे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. |
| **३.** | आरोपीने संहितेचे कलम ४३७–अ नुसार दिलेला जामिन हा पुढील सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वैध राहील. |
| **४.** | आरोपीस मुक्त करण्यात येते. |
| **५.** | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.04.10 17:42:40 +0530

दिनांक १०/०४/२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, या पी.डी.एफ फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेश/न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | शैलेश पोपट पालवे,<br>लघुलेखक (श्रेणी – ३) |
| न्यायालयाचे नाव | – | श्री. अनंत रा. टेंगसे,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>कोर्ट नं. २, अकोले. |
| आदेश/न्यायनिर्णय दिनांक | – | १०/०४/२०२६ |
| न्यायदंडाधिकारी सही | – | १०/०४/२०२६ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड दिनांक | – | १०/०४/२०२६ |